भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :- भिवंडी मनपा अंतर्गत प्रभाग क्र.२ वॉर्ड क्र.१५ मधिल नवीवस्ती,मनपा शाळा क्र.68 नुतनीकरण करणे.**

भिवंडी मनपा अंतर्गत प्रभाग क्र.२ वॉर्ड क्र.१५ मधिल नवीवस्ती,मनपा शाळा क्र.६८ नुतनीकरण करणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,७६०/- मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक २९/०६/२०२२ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा.महासभा ठराव क्रं.५५३ दिनांक २५/०५/२०२२ अन्वये आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार क्र./नवि/टे-४/भिनिशमनपा/प्र.मा/एस.आर-१३७/२०२३ दि.२८/०३/२०२३ नुसार मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,यांचे कडुन प्रशासकिय व आर्थिक मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,९९,७६०/- ई-निविदा सुचना क्र.१५/२०२३-२४ (८९९६९३) दि.२६/०४/२०२३ रोजी दैनिक नवभारत टाईम्स,दै.महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.१०/०५/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **हिमालय मनोहर पाटील** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९१ % कमी दराने** |
| २ | मे.सागर कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | मे.बुबेरे ॲण्ड असोशिएटस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५ % कमी दराने |

वरील पैकी **हिमालय मनोहर पाटील**, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १४.९१ % कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४२,५४,२९६/- (अक्षरी बेचाळीस लाख चौपन्न हजार दोनशे शहाण्णव मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- २९६ दिनांक :- २८/६ /२०२३

हिमालय मनोहर पाटील, यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १४.९१० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.४२,५४,२९६/- (अक्षरी बेचाळीस लाख चौपन्न हजार दोनशे शहाण्णव मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी मनपा अंतर्गत प्रभाग क्र.२ वॉर्ड क्र.१५ मधिल नवीवस्ती,मनपा शाळा क्र.68 नुतनीकरण करणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार हिमालय मनोहर पाटील यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय - अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा.ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१३/६/२०२३ पर्यंत झालेला खर्च | दि.१३/६/२०२३ पर्यंतची शिल्लक | सदर लेखाशिर्षा अंतर्गत पुनर्विनियोजना साठी लागणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | दुर्बल घटक वसाहतीत नाला,गटार,कल्वर्ट बांधणे | रु. ५.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु.५.०० लक्ष | रु.४.९६/- लक्ष |
| २ | दुर्बल घटक वसाहतीत गटारे व नाले निगा व दुरुस्ती | रु. १.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु.१.०० लक्ष | रु.१.९६/- लक्ष |
| ३ | गलिच्छ वस्तीत विकास कार्य | रु. ४.८८ लक्ष | रु. १.९८ लक्ष | रु.२.८९ लक्ष | रु.६.८७/- लक्ष |
| ४ | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | रु. ४.०० लक्ष | रु. १.९८ लक्ष | रु.२.०२ लक्ष | रु.७.७५/- लक्ष |
| | एकूण | रु. १४.८८ लक्ष | रु. ३.९६ लक्ष | रु.१०.९१ लक्ष | रु.२१.५४/- लक्ष |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्या मध्ये मंजूर अर्थसंकल्पाच्या ०.५ टक्के वरील लेखाशिर्षामध्ये तरतूद ठेवणेत येते. मात्र चालू वर्षात अत्यंत अल्प तरतूद असल्यामुळे सदर लेखाशिर्षामधून सन २०२२-२३ मध्ये करणेत आलेल्या विकास कामांचे देयक अदा करता येत नाहीत. तरी खालील कामांकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "मैदान सुधारणा" व "शहरातील स्पोर्टस कॉम्प्लेक्स,व्यायामशाळा,वाचनालय व स्पोटर्स स्टेडीयम निगा व दुरुस्ती " या लेखाशिर्षामधुन रु. २१.५४. लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| १.वार्ड क्र.१४ मध्ये सहयोगनगर येथे सविता पासले,विनोद वायले,गंगाधर संदुपटला ,लालबहादूर सिंग,शोभानाथ यादव यांचे घराजवळ गटार बनविणे. (दुर्बल घटक वसाहतीत नाला,गटार,कल्वर्ट बांधणे ) | रु. ९.९५,७३८/- | |
| 2. भिवंडी नि.श महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत वार्ड क्र.२ मधील सी.एम.शाळा परिसरातील गटाराची दुरुस्ती करणे. (दुर्बल घटक वसाहतीत गटारे व नाले निगा व दुरुस्ती) | रु. २,९५,९६०/- | |
| ३.वार्ड क्र.१५ नेहरुनगर मध्ये जगन मगन चाळ ते मद्रसी चाळ पर्यत गटार व पाथवेज बनविणे. (गलिच्छ वस्तीत विकास कार्य) | रु. ९,७६,०६७/- | |
| ४.प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील रिजवान मनी ट्रान्सफार्मर ते मदरसा द्रलुम हसमटुल उलुम म्हाडा कॉलनी नदीनाका येथे गटार बनविणे. (गलिच्छ वस्तीत विकास कार्य) | रु. ९,७७,१६५/- | |
| एकूण | रु.३२,४४,९३०/- | |

**खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन प्रस्तावित :**

| अ. क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१३/६/२०२३ पर्यत झालेला खर्च | दि.१३/६/२०२३ पर्यंतची शिल्लक | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मैदान सुधारणा | रु. १०.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु. १०.०० लक्ष | रु.४.९६ लक्ष |
| १ | शहरातील स्पोर्टस कॉम्प्लेक्स,व्यायामशाळा, वाचनालय व स्पोटर्स स्टेडीयम निगा व दुरुस्ती | रु. १००.०० लक्ष | रु.४.९९ लक्ष | रु. ९५.०१ लक्ष | रु.१६.५८ लक्ष |
| | एकूण | रु. ११०.०० लक्ष | रु.४.९९ लक्ष | रु. १०५.०१ लक्ष | रु.२१.५४ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३,व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो. व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्याकडे निहीत आहेत.

१) दुर्बल घटक वसाहतीत नाला,गटार,कल्वर्ट ब्रांधणे २) दुर्बल घटक वसाहतीत गटारे व नाले निगा व दुरुस्ती ३) गलिच्छ वस्तीत विकास कार्य ४) दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य या लेखाशिर्षामध्ये "मैदान सुधारणा" व "शहरातील स्पोर्टस कॉम्प्लेक्स,व्यायामशाळा,वाचनालय व स्पोटर्स स्टेडीयम निगा व दुरुस्ती" या लेखाशिर्षामधून रु. २१.५४ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी दिनांक २१/०६/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. 296 दिनांक 28/06/२०२३

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१,२,३ व ५ मधील विविध केलेल्या विकास कामांचे देयक अदा करणेकामी १ ) दुर्बल घटक वसाहतीत नाला,गटार,कल्वर्ट बांधणे २) दुर्बल घटक वसाहतीत गटारे व नाले निगा व दुरुस्ती ३) गलिच्छ वस्तीत विकास कार्य ४) दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य या लेखाशिर्षामध्ये पुरेशी तरतूद शिल्लक नसल्याने "मैदान सुधारणा" या लेखा मधून रु.४.९६ लक्ष व "शहरातील स्पोर्टस कॉम्प्लेक्स,व्यायामशाळा,वाचनालय व स्पोटर्स स्टेडीयम निगा व दुरुस्ती" या लेखा मधून रु.१६.५८ लक्ष असे दोन्ही लेखाशिर्षामधून एकूण रु. २१.५४ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजनाने वरील लेखाशिर्षामध्ये निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**